महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबईतील ऐतिहासिक मुंबई पोर्ट ट्रस्ट (बीपीटी) बंदर येथील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करण्याबाबत

(१) ६५७५ (०७-०५-२०१५) श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर): सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ऐतिहासिक मुंबई पोर्ट ट्रस्ट (बीपीटी) बंदर बंद करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोर्ट ट्रस्टच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्टयातील नागरिकांच्या पुनर्वसनाची योजना काय आहे व मुंबई पोर्ट ट्रस्टच्या ताब्यातील जागा शासन संपादित करणार आहे काय,

(३) अद्याप बीपीटीच्या ताब्यातील जागेबाबत निर्णय झाला नसल्यास त्यानुषंगाने केंद्र व शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०२-२०१९) : (१) अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या अहवालानुसार, मुंबईतील ऐतिहासिक मुंबई पोर्ट ट्रस्टमधील जमिनीचा भूखंड हा बीपीटीच्या मालकीचा असून सदर जागेवर अतिक्रमण निष्कासनाबाबत अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर या कार्यालयातील सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली नाही. तसेच, महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम ३(झेड) २ अन्वये कोणतीही कार्यवाही उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) तथा सक्षम प्राधिकारी, कुलाबा यांच्या कार्यालयाने केली नाही.

(२) सदर जागा केंद्र शासनाच्या मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्या मालकीची असल्याने पर्यायी सदनिका उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भ्ावत नाही.

(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासह राज्यातील खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान मिळण्याबाबत

(२) ७११२६ (६-०२-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ४३ खाजगी प्राथमिक शाळांना अनुदान मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी अनुदानित शाळांना वेतन व पेन्शनसाठी शासनामार्फत १०० टक्के अनुदान देण्यात येते मात्र नगरपालिका आणि महानगरपालिका शाळांना केवळ ५० ते ८० टक्के अनुदान देण्यात येते, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-०२०१) : (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई म.न.पा. क्षेत्रातील महानगरपालिका संलग्नित शाळा व खाजगी व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणाऱ्या खाजगी प्राथमिक अनुदानित शाळांसाठी वेतन व वेतनेतर अनुदानापोटी केलेल्या खर्चावर शासनाकडून ५०% अनुदान शासनाच्या दराने अनुज्ञेय केले जाते.

तसेच, महानगरपालिकेच्या शाळांनाही ५०% अनुदान शासनाच्या दराने अनुज्ञेय केले जाते. महानगरपालिका व खाजगी शाळांतील कर्मचारी वृंदासाठी लागू असलेल्या निवृत्ती वेतन योजनांसाठी शासनाकडून अनुदान देण्यात येत नाही.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम ३(१) व कलम ९ तसेच महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ मधील नियम ४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राथमिक शिक्षणावरील मान्य बाबीवरील खर्च भागविण्यासाठी अनुदानाचे पूर्वी ठरवून दिल्यानुसार खालीलप्रमाणे सूत्र ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे:-

- अ वर्ग नगरपरिषद - ८०%
- ब वर्ग नगरपरिषद - ९०%
- क वर्ग नगरपरिषद - १००%
- महानगरपालिका - ५०%

मुंबईत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत म्हाडातर्फे करण्यात येणाऱ्या गृह नोंदणीच्या सर्व्हेक्षणाकरिता खाजगी एजन्सीद्वारे नागरिकांकडून पैसे आकारण्यात येत असल्याबाबत

(३) ७५५०९ (११-०२-२०१९) श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत म्हाडातर्फे करण्यात येणारी गृह नोंदणीचे सर्व्हेक्षण मोफत असतानाही काही खाजगी एजन्सी नागरिकांकडून पैसे घेत असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घर देण्याचे आमिष दाखवून मुंबईतील अनेक ठिकाणी अर्जाची विक्री होत आहे व ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी १०० ते ४०० रुपये आकारण्यात येतात असेही दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, नागरिकांची फसवणूक होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (११-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

या प्रकरणी माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्याकडे कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

सदर सर्वेक्षणाकरिता म्हाडातर्फे कोणतीही खाजगी/अशासकीय संस्था अथवा खाजगी विकासक यांची नेमणूक केलेली नाही. तसेच या कामासाठी म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार अथवा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही.

(२) व (३)

याबाबत म्हाडामार्फत म्हाडाच्या संकेतस्थळावर PMAY या लिंक अंतर्गत "सदर सर्वेक्षणाकरिता म्हाडातर्फे कोणतीही खाजगी/अशासकीय संस्था अथवा खाजगी विकासक यांची नेमणूक केलेली नाही. तसेच या सर्वेक्षणात सहभागी होण्याकरिता कोणतेही शुल्क कोणत्याही प्रकारे आकारण्यात येणार नाही. सदनिकांच्या सर्वेक्षणासाठी कोणालाही म्हाडाने प्रतिनिधी, सल्लागार अथवा प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तींशी परस्पर व्यवहार करु नये. अशा प्रकारच्या व्यवहारास/फसवणुकीस म्हाडा जबाबदार राहणार नाही." अशा प्रकारची माहिती उपलब्ध करुन जनतेस अवगत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर विभागातील वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये पात्र अग्निशमन अधिकाऱ्यांची नियुक्ती नसल्याबाबत

(४) ७७६३७ (२०-०४-२०१७) डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, या जिल्हयामध्ये पात्र अग्निशमन अधिकाऱ्यांची नियुक्ती नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पात्र अग्निशमन अधिकारी विदर्भातील पाच जिल्हयात नसल्याने अनेक अडचणी व मोठ्या समस्यांना सामोरे जाण्याच्या धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरातील अग्निशमन केंद्राचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मंजूर पदापैंकी फक्त ११२ पदे अद्यापपर्यंत भरली गेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१९) : (१) अंशतः खरे आहे.

सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार अग्निशमन सेवेतील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार देऊन आवश्यक कामकाज करण्यात येत आहे.

(३) नागपूर महानगरपालिकेशी संबंधित अग्निशमन केंद्राबाबत कोणताही प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित नाही.

(४) व (५) नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या आकृतीबंधानुसार मंजूर ५५७ पदांपैकी १५२ पदे कार्यरत असून, आणखी ६७ पदे भरणेबाबतची प्रक्रिया नागपूर महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील 'क' आणि 'ड' महानगरपालिकांसह सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या हद्दीतील मालमत्तांचे जी.आय.एस.वर मॅपिंग करुन त्यावर आधारित मालमत्ता कराची आकारणी करण्याबाबत

(५) ८६६०६ (२३-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील 'क' आणि 'ड' महानगरपालिकांसह सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या हद्दीतील मालमत्तांचे जी.आय.एस.वर मॅपिंग करुन त्यावर आधारित मालमत्ता कराची आकारणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील किती नागरी संस्थामधील जवळपास किती लक्ष मालमत्तांचा अचुक मालमत्ता कर जी.आय.एस.नुसार होणार आहे व त्यामुळे किती मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ होणार आहे,
(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) असल्यास, अद्याप अंमलबजावणीस सुरुवात झाली नसल्यास किती कालावधी लागण्याचे अपेक्षित आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

हुपरी (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील सूर्य तलावामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याबाबत

(६) ८८७२८ (१८-०८-२०१७) डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हुपरी (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथील सूर्य तलावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा बसविणे व तलावाचे सुशोभिकरण करण्याचा निर्णय ग्रामसभेने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यासह तलावाचे सुशोभिकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०२-२०१९) : (१) व (२)
• हुपरी येथील सुर्य तलावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणेबाबत तत्कालीन हुपरी ग्रामपंचायतीच्या दिनांक २१/३/२०१७ च्या ग्रामसभेमध्ये निर्णय घेण्यात आला होता. तथापि, त्याआधीच दिनांक ३१/७/२०१५ रोजी हुपरी ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर करण्याबाबतची प्राथमिक अधिसूचना काढून शासनाने आक्षेप मागविले होते.
• आक्षेप विचारात घेऊन, शासनाने अंतिमत: दिनांक ११/४/२०१७ रोजी हुपरी ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर केले.
• सुर्य तलावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणे व सुशोभिकरण या कामाला नगरपरिषदेची संमती आवश्यक ठरते.

• हुपरी नगरपरिषदेने दिनांक २७/४/२०१८ रोजी ठराव क्रमांक २१ अन्वये सुर्य तलावाचे प्रादेशिक पर्यटन विकास कार्यक्रमांतर्गत सुशोभिकरण करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करुन त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे दिनांक २२ मे, २०१८ रोजी सादर करण्यात आला.

• जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दिनांक १/१२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक विभागाकडे सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

नागपूर येथील दिक्षाभूमि प्रमाणे ताजबागला 'अ' वर्ग पर्यटन/तिर्थ स्थळाचा दर्जा देण्याबाबत

(७) ९९७५ (२६-१२-२०१७) श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दिक्षाभूमि प्रमाणे ताजबागला 'अ' वर्ग पर्यटन/तिर्थ स्थळाचा दर्जा त्वरीत घोषित करण्याची मागणीचा प्रस्ताव व ठराव नगरविकास विभाग व पर्यटन सांस्कृतिक विभाग यांच्याकडे विभागीय आयुक्तामार्फत व जिल्हाधिकारीमार्फत दिनांक ११ ऑगस्ट,२०१४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताजबाग हजरत ताजुद्दीन बाबा दर्गा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर लाखो विविध समाजातील भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने दिनांक १७ फेब्रुवारी,२००५ रोजी उपरोक्त तिर्थक्षेत्र महाराष्ट्र शासनाने 'क' तिर्थक्षेत्र घोषित केले परंतू 'अ' किंवा 'ब' तिर्थक्षेत्र घोषित करण्यासाठी कोणीही मागणी केली नसल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार ताजबाग हजरत ताजुद्दीन बाबा दर्ग्यास 'अ' तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१९) : (१) याबाबत जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावाची प्रत प्राप्त करुन घेण्यात आली आहे.

(२), (३) व (४) याबाबतच्या प्रस्तावाची शासन निर्णय दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार तपासणी करण्यात येत आहे.

भांडूप (प.) येथील महानगरपालिकेच्या एस विभागात झोपू प्राधिकरणांतर्गत विकासकाने विना परवाना झाडांची कत्तल केल्याबाबत

(८) १०८००० (१९-०४-२०१८) श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरात पुनर्विकासाच्या इमारत बांधकामाच्या वेळी म्हाडाच्या झोपू प्राधिकरण व खाजगी बांधकाम करणा-या विकासकाकडून वृक्ष प्राधिकरणाकडे बांधकामामध्ये अडथळे येणा-या वृक्षांची तोड करण्याची परवानगी मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवानगी देतेवेळी वृक्ष प्राधिकरणाने १ झाडाच्या कापणीच्या मोबदल्यात २ झाडांचे पुनर्रोपण करण्याच्या अटीवर परवानगी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाने कत्तल केलेल्या झाडांच्या बदल्यात दोन वृक्षांचे पुनर्रोपण व जतन केले किंवा नाही याचे सर्व्हेक्षण केले जाते आहे काय,

(४) असल्यास, वृक्ष प्राधिकरणामार्फत कत्तल केलेल्या झाडांच्या बदल्यात विकासकाकडून पुनर्रोपण व जतन केले जावे यासाठी सर्व्हेक्षण यंत्रणा उभारण्यात यावी व याबाबतचा अहवाल प्राधिकरणाने पर्यावरण विभागाकडे सादर करावा अशी मागणी पर्यावरण मंत्री यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत केल्यानंतर सदर मागणी मा.मुख्यमंत्री यांनी मान्य केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भांडूप (प.) येथील महानगरपालिकेच्या एस विभागात झोपडपट्टी पुनर्विकासाचे झोपू प्राधिकरणांतर्गत सुरु असलेल्या बांधकामाच्या विकासकाने विना परवाना कत्तल केलेल्या झाडांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मे. किंग्ज बिल्डर्स आणि डेव्हलपर्स यांना न.भू.क्र. ८७(भाग), ९७(भाग) भांडूप गाव, भांडूप (पश्चिम) या भूभागावरील १ वृक्ष कापणे, ६ वृक्ष पुनर्रोपित करणे व उर्वरित १ वृक्ष आहे तसाच ठेवण्यासाकरिता वृक्ष प्राधिकरण समितीने परवानगी दिली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दिनांक १९.०१.२०१८ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत स्थळपाहणी करण्यात आली असून, त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविण्यात आले असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत वृक्ष प्राधिकरणाने दिलेल्या परवानगीनुसार, कापणी करण्यात आलेल्या १ वृक्षाच्या बदल्यात नवीन ३ वृक्ष लावण्यात आले आहेत व सदर भूभागावर विकासकाने अधिकची २ झाडे लावली आहेत.

तसेच, पुनर्रोपित करण्याकरिता परवानगी देण्यात आलेल्या ६ वृक्षांपैकी ४ वृक्ष पुनर्रोपित करण्यात आले असून, त्यापैकी १ वृक्ष जिवंत आहे व उर्वरित ३ वृक्ष सुकलेली आहेत. सुकलेल्या ३ वृक्षांकरिता विकासकामार्फत जमा करण्यात आलेली अनामत जप्त करण्याची कारवाई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

अंबरनाथ नगरपालिकेला शौचालये बांधणेसाठी दिलेल्या निधीचा विनियोग होत नसल्याबाबत

(९) १०९०८४ (१२-०४-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ नगरपालिकेला कचरा मुक्ती, भुयारी गटार आणि हागणदारीमुक्त या कार्यक्रमात वैयक्तिक शौचालये बांधणे या गोष्टीसाठी ४.०० कोटी रुपये देऊन गौरविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बक्षिसांच्या ४ कोटी रुपयांच्या रकमेचा विनयोग करण्यासठी मे महिन्यातच शासनाने मार्गदर्शक तत्वे जारी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) नगरपरिषदांच्या सन्मानार्थ देण्यात येणाऱ्या निधीच्या विनियोगाबाबतची कार्यपध्दती दि.२६/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहीत केली आहे, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

कल्याण अंबरनाथ महामार्ग विस्तारीकरण बाधितांच्या पुनर्वसनाबाबत

(१०) ११०८०७ (१४-०४-२०१८) श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील इंदिरा गांधी भाजी मार्केट येथे पुनर्वसन करणे व प्रकल्पग्रस्त बाधितांना ५० टक्के बाधित क्षेत्र एवढे बांधकाम करण्याची अनुमती कुरार पॅटर्न प्रमाणे देणे व ६७ निवासी सदनिका धारकांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही प्राधन्याने करण्याबाबत आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका व उपविभागीय अधिकारी,उल्हासनगर यांना मा.राज्यमंत्री नगरविकास यांच्या दालनात सर्व संबधितांची दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास बैठक होउन आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीस एक वर्षाहून अधिक कालावधी उलटूनही बैठकीतील आदेशानुसार कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनस्तरावर कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१), (२) व (३) कल्याण-अंबरनाथ महामार्ग कामातील विलंबाची चौकशी करणे या विषयाबाबत मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत:-

• कल्याण-अंबरनाथ राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाबाबतची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी तात्काळ पूर्ण करावी.

• रस्ता रुंदीकरण प्रकल्पात पूर्णत: बाधीत (१०० टक्के) प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन इंदिरा गांधी भाजी मार्केट, उल्हासनगर येथे करावे.

• अंशत: बाधीत क्षेत्र (५० टक्के) ८ प्रकल्पग्रस्तांना बाधीत क्षेत्राएवढे बांधकाम करण्यास अनुमती तसेच ६७ निवासी सदनिकाधारकांचे पुनर्वसन करण्याची कार्यवाही आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी प्राथम्याने करावी.

• उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावाबाबत उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर/जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे पाठपुरावा करुन पुढील कार्यवाही तात्काळ करण्याचे सदर आदेश प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांचेकडे आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी पाठपुरावा करावा.

• आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदर रस्ता रुंदीकरण प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्तांचे पुन:श्च सर्वेक्षण सात दिवसांच्या आत करावे.

• उल्हासनगर शहरात अनधिकृत बांधकामांचे निष्कासन करण्याच्या अनुषंगाने जबाबदार अधिकाऱ्यांची टीम तयार करुन मोहिम हाती घ्यावी.

(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

राज्यातील अनेक महानगरपालिका आणि नगरपालिका व अन्य प्राधिकरणांच्या अग्निशमन दलात कंत्राटी पध्दतीने भरती करण्याची पध्दत असल्याबाबत

(११) १११७७६ (१२-०४-२०१८) श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुबई महानगरपालिका वगळून राज्यातील अनेक महानगरपालिका आणि नगरपालिका व अन्य प्राधिकरणांच्या अग्निशमन दलात कंत्राटी पध्दतीने भरती करण्याची पध्दत असून ती बंद करावी अशी महत्वपूर्ण मागणी कामगार सेनेने शासनाकडे माहे जानेवरी ,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागणीनुसार शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) सदर बाब तपासून याबाबत नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

मुंबई शहर व उपनगरात खेळासाठी मोकळी जागा व मैदाने उपलब्ध नसल्याबाबत

(१२) ११२३९१ (०३-०४-२०१८) श्री.राज पुरोहित (कुलाबा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात लहान मुलांसाठी तसेच युवा पिढीसाठी पुरेशा प्रमाणात खेळण्याची मोकळी जागा व मैदाने उपलब्ध नसल्याची बाब माहे जून, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या मोकळया जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण व खाजगीकरण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लहान मुले व युवा पिढीला खेळण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने मानसिक व शारिरीक विकासापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मैदाने व मोकळया जागांचा वापर व्यासायिकीकरणासाठी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती चौकशी केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१), (२), (३), (४) व (५)

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जनतेसाठी महानगरपालिकेमार्फत २२९ उद्याने, ४३२ मनोरंजन मैदाने, ३१९ मैदाने आणि २५ पार्क उपलब्ध करुन देण्यात आल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच, क्रिडा स्पर्धेचे आयोजन वाढविण्यासाठी व राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी दिनांक १८.०३.२०१३ रोजीच्या परिपत्रकात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुधारणा करण्यात आली असून, दिनांक १९.०१.२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार, दिनांक १८.०३.२०१३ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे, महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मैदानांवर क्रिडा स्पर्धेच्या वापराकरिता एक दिवसासाठी रु. १०००/- इतके भाडे आकारणी करण्यात येत आहे.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत असलेल्या सिंधी माध्यमाच्या शिक्षकांना उल्हासनगर महानगरपालिका हिंदी माध्यमाच्या शाळेत रिक्त असलेल्या पदावर त्वरित समायोजन करण्याबाबत

(१३) ११५७३८ (१२-०४-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिका शिक्षण मंडळ अंतर्गत असलेल्या सिंधी माध्यमाच्या अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमध्ये अतिरीक्त ठरवलेल्या सिंधी माध्यमाच्या शिक्षकांना उल्हासनगर महानगरपालिका हिंदी माध्यमाच्या शाळेत रिक्त असलेल्या पदावर त्वरित समायोजन करण्याबाबत दिनांक ०२ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या लोकप्रतिनिधी व

सर्व संबंधित शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचित केलेले असतानाही केवल कागदी पत्रव्यवहार अतिरिक्त समायोजनाची कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे व शिक्षकांना माहे जून, २०१७ पासून वेतन अदा नसल्याने त्यांची उपासमार होत असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात बऱ्याच प्रमाणात गैरव्यवहार, अनियमितता होत असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाची "दप्तर तपासणी" शासनाच्या शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्वरित करावी हे ही कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) ही बाब खरी नसल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) व (४) उल्हासनगर महानगरपालिका हिंदी माध्यमाच्या शाळेत रिक्त असलेल्या पदावर त्वरित समायोजन करण्याकरिता महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाची बिंदूनामावली कोंकण भवन, बेलापूर, नवी मुंबई यांचेकडून दिनांक ३१.०५.२०१८ रोजी प्रमाणित करण्यात आली असून, अनुशेषाला बाधा न येता रिक्त पदावर समायोजन करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सिंधी माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांतील सर्व शिक्षकांचे तसेच, अतिरिक्त ठरविलेल्या सर्व शिक्षकांचे वेतन, वेतन पथक जिल्हा परिषद, ठाणे यांचेमार्फत अदा करण्यात येते.

अतिरिक्त ठरविलेल्या शिक्षकांचे मे, २०१८ पर्यंतचे वेतन जिल्हा परिषद, ठाणे यांचेमार्फत अदा करण्यात आल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील कब्रस्तानसाठी राखीव असलेल्या प्लॉटवर अतिक्रमण करून रेनॉल्ट वाहन कंपनीचे शोरूम बांधण्यात आल्याबाबत

(१४) ११६५७५ (०३-०८-२०१८) ॲड.वारीस पठाण (भायखळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील जोगेश्वरी-विक्रोली लिंक रोडच्या जवळ कब्रस्तानसाठी राखीव असलेल्या प्लॉटवर अतिक्रमण करून त्यावर रेनॉल्ट वाहन कंपनीचे शोरूम बांधल्याची तक्रार स्थानिक नागरिक, विविध सामाजिक, धार्मिक संघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (नगरविकास) मा.मंत्री (अल्पसंख्याक विकास), महानगरपालिका आयुक्त, बृमपा, मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे लेखी स्वरूपात माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती दोषींवर

शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) :
(१), (२) व (३) सदर अनधिकृत बांधकामावर दिनांक ०८.०९.२००३ व दिनांक २३.१२.२०१३ रोजी मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४(अ) अन्वये नोटीस बजावून महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, महानगरपालिकेमार्फत सदर बांधकामावर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली असून, पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

कुर्ला (मुंबई) येथील मिठी नदीवर संरक्षक भिंत बांधणे व सुशोभिकरणाची कामे करण्याबाबत

(१५) ११६६७३ (२३-०७-२०१८). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिठी नदीचे दिनांक २६ जुलै, २००५ रोजीच्या पुरानंतर रुंदीकरण करणे आणि सरंक्षण भिंत बांधण्याचा निर्णय झाला असून मिठी नदीची रुंदी वाढविताना नदीच्या बाजूने संरक्षक भिंत बांधणे, नदी पात्रातील लोकांचे पुनर्वसन करणे अशा उपाययोजना आखण्याचे ठरले व त्यासाठी एमएमआयडीएची नियुक्ती करण्यात आली व कालांतराने सन २०१४ सालानंतर नदीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सोपविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र ४ वर्ष उलटूनही कुर्ला येथील मिठी नदीवर संरक्षक भिंत व सुशोभिकरणाची कामे आजपर्यंत झालेली नाहीत, हे ही खरे आहेत काय,
(३) असल्यास, संरक्षक भिंत बांधण्यास व अन्य निश्चीत केलेली कामे आजमितीस न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, मिठी नदीची गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच संरक्षक भिंत विनाविलंब बांधण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) दिनांक २९.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, मिठी नदी विकास प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता मिठी नदीची दोन भागांत विभागणी करण्यात आली आहे.

त्यानुसार मिठी नदीचा फिल्टरपाडा, पवई ते सी.एस.टी. पूल, कुर्ला या दरम्यानचा ११ कि.मी. चा भाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असून, सी.एस.टी. पूल, कुर्ला ते माहिम कॉजवे दरम्यानचा ६ कि.मी. चा भाग एमएमआरडीए च्या अखत्यारीत असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) मिठी नदीच्या कुर्ला परिसरातील एकूण ७.६ कि.मी. लांबीच्या संरक्षक भिंतीच्या कामापैकी ५.६ कि.मी. एवढया लांबीच्या संरक्षक भिंत बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे.

(३) मिठी नदी विकास प्रकल्पातील अंतर्भूत उर्वरित कामे ही नदी किनाऱ्यालगत असलेल्या अतिक्रमणे, जागेचे हस्तांतरण व न्यायप्रविष्ठ प्रकरणे यांमुळे प्रलंबित असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) व (५) मिठी नदीची गुणवत्ता सुधारण्यासाठी व संरक्षक भिंत बांधण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत:-

• मिठी नदीच्या कुर्ला येथील कुर्ला-कलिना पूल ते सी.एस.टी. पूल दरम्यानचा भाग वगळता उर्वरित नदीचे रुंदीकरण जवळपास पूर्ण झाले आहे.

• महानगरपालिकेच्या अखत्यारीतील मिठी नदीच्या संरक्षक भिंतीच्या एकूण २१.५८८ कि.मी. लांबीपैकी १५.८४९ कि.मी. लांबीच्या संरक्षण भिंतीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

• कुर्ला येथील क्रांतीनगर पूल ते विमानतळ धावपट्टी पूल दरम्यान व कुर्ला हिंदू स्मशानभूमी लगतच्या मिठी नदीच्या पूर्व किनारपट्टीवरील सेवारस्त्यांचे सुशोभिकरण करण्यात आले आहे.

• मिठी नदी विकास प्रकल्पातील बहुतांश कामे अतिक्रमणांमुळे बाधीत असून, सदर अतिक्रमण निर्मुलनाचे काम महानगरपालिकेच्या संबंधित विभागामार्फत युध्दपातळीवर हाती घेण्यात आले आहे.

• मिठी नदीच्या परिसरातील झोपडया व कारखान्यांमुळे निर्माण होणारा बिनपावसाळी जलप्रवाह निरनिराळया नाल्यांद्वारे मिठी नदीत प्रवाहित होऊन मिठी नदी प्रदुषित झाली आहे. मिठी नदीत होणाऱ्या प्रदुषणाचे निर्मुलन करण्याच्या उपाययोजना सुचविण्यासाठी सल्लागार मे. फिशमन प्रभू यांची नेमणुक करण्यात आल असून, त्यांनी दिर्घ मुदतीची व अल्प मुदतीची कामे सुचविली आहेत.

• अल्प मुदतीतील कामांसाठी कंत्राटदाराची नेमणुक करण्यात आली असून, सदर काम प्रगतीपथावर आहे.

• दिर्घ मुदतीच्या कामांचे अंदाजित खर्च, नकाशे व मसुदा निविदा तयार करण्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

मुंबईतील महालक्ष्मी मंदिरात जाण्यासाठी पादचारी मार्ग तयार करण्याबाबत

(१६) ११६७०९ (२६-०७-२०१८) श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महालक्ष्मी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या देशी-विदेशी भाविकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत असल्याने सद्यस्थितीत मंदिरात जाण्यासाठी अत्यंत चिंचोळा मार्ग उपलब्ध असल्याने भाविकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची दाट शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंदिरात प्रवेश करण्यासाठी अन्य रस्त्याची नितांत आवश्यकता असल्याने भुलाभाई देसाई मार्गावरील आकृती पार्क इमारतीजवळून समुद्रालगत महालक्ष्मी मंदिरापर्यंतच्या पादचारी मार्गासाठी ४ मीटर रुंदीचा रस्ता तयार करण्याबाबतची आग्रही मागणी महालक्ष्मी मंदिर व्यवस्थापन सन १९९६ पासून आजमितीपर्यंत शासनाकडे सातत्याने करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्ता तयार करण्यासाठी केंद्र शासन, वन विभाग व पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महालक्ष्मी मंदिर व्यवस्थापनाने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने मुंबईतील भुलाभाई देसाई मार्गावरील आकृती पार्क इमारती जवळून समुद्रालगत महालक्ष्मी मंदिरापर्यंत पादचारी मार्ग तयार करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) मुंबईतील महालक्ष्मी मंदिरात जाण्यासाठी दोन मार्ग उपलब्ध असून, एक मार्ग वाहनांकरिता व दुसरा मार्ग पादऱ्यांकरिता उपलब्ध असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२), (३), (४) व (५) महालक्ष्मी मंदिर ते आकृती पार्क इमारतीपर्यंत समुद्रालगत पादचारी पुलाच्या कामाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली होती.

तथापि, विकास नियोजन आराखडयात दर्शविलेला चार मीटर रुंदीचा रस्ता महालक्ष्मी मंदिराच्या मागील बाजूस ते आकृतीपार्क इमारतीच्या आवाराच्या भिंतीपर्यंत दर्शविण्यात आला आहे.

प्रस्तावित रस्ता भुलाभाई देसाई मार्गापर्यंत जोडावयाचा असल्यास सदर रस्ता आकृतीपार्क इमारतीच्या आवारामधून जोडणे आवश्यक आहे. सध्या इमारत व कंपाऊंड वॉलच्या दरम्यानची जागा इमारतीच्या प्रवेशद्वारावर ६.२ मीटर असून, ती पुढे ४.३० मीटर पर्यंत कमी होत जात आहे. या उपलब्ध जागेत भाविकांना प्रवेश दिल्यास सदर इमारतीतील बाहेर पडणाऱ्या व आत येणाऱ्या गाडया आणि भाविकांची रहदारी यामुळे चेंगराचेंगरी व अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यास्तव सदर ठिकाणी आकृतीपार्कच्या कंपाऊंडमधून भाविकांना रहदारीकरिता रस्ता करणे तांत्रिकदृष्टया उचित ठरत नाही. त्यामुळे सदर प्रस्तावावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अंमलबजावणी करणे शक्य झाले नसल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

फितवाला रोड, एलफिस्टन(मुंबई) येथील इंडिया बुल्स या खासगी कंपनीने पदपथावर अनधिकृतरित्या सिमेंटचा भराव टाकून रँप बांधल्याबाबत

(१७) ११७०४४ (२३-०७-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फितवाला रोड एलफिस्टन,मुंबई येथील इंडियाबुल्स या खासगी कंपनीने पदपथावर अनधिकृतरित्या सिमेंटचा भराव टाकून रँप बांधुन पावसाळी पाणी वाहुन नेणारी गटार वाहीनी बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सहाय्यक आयुक्त, ग-दक्षिण विभाग, मुंबई महानगरपालिका यांच्याकडे दिनांक ०१ जानेवारी, २०१६ रोजी व त्यानंतर वारंवार तसेच मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे तक्रार करुनही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २ वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेला तरीही अद्याप कारवाई न करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) फितवाला रोड, एलफिस्टन (मुंबई) येथे दिनांक ०१.०७.२०१६ रोजीच्या मंजूर नकाशानुसार संबंधित विकासकामार्फत इंडिया बुल विकासकाच्या जागेवर प्रवेशद्वार बांधण्यात आले आहे.

सदर रॅम्प पदपथावर नसल्याने, सिमेंटचा भराव टाकून पावसाळी पाणी वाहून नेणारी गटार वाहिनी/पर्जन्य जलवाहिनी बंद केली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) फितवाला रस्त्याची पदपथासह दर्जोन्नती करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महनगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालय आणि दवाखान्यांमध्ये केलेल्या अभ्यास विश्लेषणात ३१ टक्के मुंबईकर मानसिकदृष्टया आजारी असल्याचा काढलेला निष्कर्ष

(१८) ११७४१७ (२३-०७-२०१८) श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालय आणि दवाखान्यांमध्ये दोन वर्षात केलेल्या अभ्यास विश्लेषणात ३१ टक्के मुंबईकरांना मनोविकारांशी संबंधित आजार असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर मधुमेह, रक्तदाब, श्वान दंश, इत्यादी आजारांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आजार होवू नयेत व रुग्णांवर तातडीने उपचार करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यांत माहे ऑक्टोबर २०१५ ते माहे सप्टेंबर, २०१७ या कालावधीत एकूण रुग्णांपैकी २.७५% रुग्णांनी मुधमेह, २.३३% रुग्णांनी उच्च रक्तदाब व १.०५% रुग्णांनी प्राणीदंशसाठी उपचार घेतल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(३) सदर रुग्णांवर तातडीने उपचार करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या/येत आहेत:-
• महानगरपालिकेच्या सर्व दवाखान्यांमध्ये निदान, उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.
• रुग्णांना आरोग्यदायी शैलीचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहीत केले जाते.
• जनसामान्यांमध्ये आजारांबाबत जनजागृती व्हावी म्हणून आरोग्य शिबिरे तसेच इतर उपक्रम राबविण्यात येतात.
• आजारासंबंधीत गुंतागुंतीचे निदान लवकर व्हावे यासाठी दवाखान्यांमध्ये विशेष नेत्रतपासणी उपक्रम राबविण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईच्या लोकसंख्येचा विचार करता पाच मुंबईकरांमागे एकच वृक्ष असल्याबाबत

(१९) ११७९०२ (२३-०७-२०१८) श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि शासन मुंबई पर्यावरणाच्या दृष्टीने ठिकठाक असल्याचे सांगत असले तरी मुंबईच्या लोकसंख्येचा विचार करता पाच मुंबईकरांमागे एकच वृक्ष असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष गणनेनुसार २९,७५,२८३ वृक्षांची नोंद करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• पर्यावरणाच्या दृष्टीने शहरातील झाडांची संख्या वाढावी याकरिता दरवर्षी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविण्यात येतो.

• शहरातील हिरवळीचे प्रमाण वाढविण्याकरिता महानगरपालिकेच्या अखत्यारीतील उद्याने, मैदाने, मनोरंजन मैदाने, रस्ता दुभाजक वाहतूक बेटे या ठिकाणी विविध प्रकारची झाडे लावण्यात येतात व त्याचे परिरक्षण करण्यात येते.

• सन २०१८ मध्ये शासनाच्या १३ कोटी वृक्ष लागवडीच्या विशेष कार्यक्रमांतर्गत १ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत १०,१०३ इतके वृक्ष लावण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोरिवली (मुंबई) येथील गोराई-मनोरी येथे अग्निशमन केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

(२०) ११७९४७ (२६-०७-२०१८) श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई बोरिवली येथील गोराई-मनोरी येथे मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असून, त्या परिसरात स्थानिक नागरिकांकडून शासनाकडे अग्निशमन केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी सातत्याने करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरात वाढती नागरिकांची लोकसंख्या पाहता फायर ब्रिगेडसाठी तात्काळ जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन कोणती कार्यवाही वा उपाययोजना करणार वा करित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या दालनात दिनांक ३०.०७.२०१८ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

तसेच, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ०७.०८.२०१८ रोजी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत गोराई गावाचा पाहणी दौरा केला होता.

(३) व (४) मंजूर विकास आराखडयानुसार, मौजे गोराई व मनोरीमध्ये अग्निशमन दलाकरिता कोणताही भूखंड आरक्षित ठेवण्यात आला नाही.

तथापि, गोराई गावातील एस्सेल वर्ल्ड परिसरात फायर इंजिनची व्यवस्था तसेच अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांकरिता चौकीचे प्रयोजनासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु असून, सदर परिसरात एस्सेल वर्ल्डच्या मालकीच्या जागेत, एस्सेल वर्ल्डकडून फायर ब्रिगेडसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

अंबोजवाडी (मालवणी,मालाड (प) मुंबई) येथील झोपडपट्टीवासियांना प्राथमिक सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

(२१) ११८०८९ (२३-०७-२०१८) श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबोजवाडी (मालवणी, मालाड (प) मुंबई) येथे झोपडपट्टी गत २० वर्षांपासून अस्तित्वात असून सदरच्या झोपडपट्टीतील रहिवाशांना पाणी, वीज व शौचालय या सारख्या प्राथमिक सोयी सुविधा मिळत नाहीत व त्या झोपडीधारकांना पिण्याचे पाणी ३५ लिटरचे कॅन ५० रुपये देऊन विकत घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडीधारकांना प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१९) : (१), (२) व (३) अंबोजवाडी ही झोपडपट्टी गलिच्छ वस्ती घोषित झाल्यानंतर त्याठिकाणी प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

तथापि, सदर ठिकाणी स्वच्छ भारत अभियानांतर्गत महानगरपालिकेमार्फत १६५ आसनी शौचकुपे बांधण्यात आली आहेत व ३२० शौचकुपे प्रस्तावित आहेत.

दिनांक ०१.०१.२००० नंतरच्या झोपडयांना पाणी पुरवठा करण्याचे धोरण आल्यानंतर, सदर ठिकाणी दररोज टँकरद्वारे टाक्यांमध्ये पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

सदर परिसरात ६०० मि.मी. व्यासाच्या ५९५ मीटर, ४५० मि.मी. व्यासाच्या ४८० मीटर, ३०० मि.मी. व्यासाच्या ८२२ मीटर, २५० मि.मी. व्यासाच्या ८७५ मीटर व १५० मि.मी. व्यासाच्या १३५२ मीटर नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरु असून, सदर जलवाहिन्या पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर अंबोजवाडी परिसरातील पाण्याची समस्या दूर करण्यात येईल असे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

मुंबई महानगरपालिकेची कार्यालये २१ दिवसांत प्लॅस्टीकमुक्त करण्याबाबत

(२२) ११८१५९ (२३-०७-२०१८) श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयकुमार गोरे (माण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेची कार्यालये २१ दिवसांत प्लॅस्टीकमुक्त करण्याची मुदत आयुक्तांनी खातेप्रमुख व सहाय्यक आयुक्तांना दिली असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत दररोज ३८ लाख प्लॅस्टीक बाटल्यांचा वापर होत असल्याने एवढया मोठया प्रमाणात जमा होत असलेल्या प्लॅस्टीकची विल्हेवाट लावण्याचे आव्हान मुंबई महानगरपालिकेपुढे असुन याबाबत कोणती आवश्यक उपाययोजना शासनाने केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत उभारण्यात आलेल्या ३७ सुका कचरा वर्गीकरण केंद्रांमध्ये संकलित सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करुन, वर्गीकृत केलेले प्लॅस्टिक पुन:चक्रीकरण करण्यासाठी पाठविले जाते.

बंदी घातलेले प्लॅस्टिक जमा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विभाग कार्यालये व इतर ६१ ठिकाणी १.१ घनमीटर क्षमतेचे डबे उपलब्ध करण्यात आले आहेत.

तसेच, ईपीआर (EPR) अंतर्गत प्लॅस्टिक निर्माण करणाऱ्या काही मोठया कंपन्यांतर्फे स्वयंसेवी संस्थांमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांत प्लॅस्टिक कचरा संकलन करुन त्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मढ, मालाड (पश्चिम) मुंबई येथील भाटी गावातील सर्व्हे नं. १२९ व १३४ (मौ, एरंगल ता, बोरिवली) या जमीनीवरील जुन्या स्मशानभूमीचा विकास करण्याबाबत

(२३) ११८१६८ (२६-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मढ, मालाड (पश्चिम) मुंबई येथील भाटी गावातील सर्व्हे नं. १२९ व १३४ (मौ, एरंगल ता, बोरिवली) या जमीनीवरील जुन्या स्मशानभूमीचा विकास करण्यात यावा अशी मागणी स्थानिक नागरिकांनी भाटी मच्छिमार सर्वोदय सहकारी सोसायटी व लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, पर्यावरण मंत्री, अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांच्याकडे दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ , २७ मार्च, २०१८ व २६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मशानभूमीचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) :(१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.
(२) व (३) सदर स्मशानभूमी ही खाजगी मालकीची असून, सदर स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी स्मशानभूमीच्या ट्रस्टकडून कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर सदर स्मशानभूमीचा विकास करणे शक्य होईल असे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

भायखळा (मुंबई) येथील लालबाग उड्डाणपूलाची दुरुस्ती करण्याबाबत

(२४) ११८८७४ (२६-०७-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील वीरमाता जिजाबाई भोसले प्राणिसंग्रहालय आणि उद्यान (राणीची बाग) ते परळ दरम्यान धोकादायक झालेल्या लालबाग उड्डाणपूलाची दुरुस्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, या उड्डाणपूलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) व (२) भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले प्राणीसंग्रहालय आणि राणीची बाग ते परळ दरम्यान लालबाग उड्डाणपुलाची दुरुस्ती करण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला असून, सदर कामासाठी महानगरपालिकेमार्फत रु. २०.३६ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) सदर पुलाच्या दुरुस्तीकरिता कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून, पुलाच्या दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

मुंबईतील अनधिकृत बांधकामे तोडण्याबाबत

(२५) ११८९७५ (२८-०७-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने सन २०१६ मध्ये एकूण १० कोटींहून अधिक रुपये खर्च करूनही बांधकामे जशीच्या तशी उभी असल्याची माहिती माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या काळात महानगरपालिकेने १४२२६ अनधिकृत बांधकामांना नोटिसा बजावल्या होत्या मात्र त्यापैकी फक्त १६२७ बांधकामांवर कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनधिकृत बांधकाम तोडल्यानंतर महानगरपालिकेने संबंधित बांधकाम धारकांकडून केवळ ८६ लाख ३२ हजार ७२६ रुपये शुल्क वसूल केले असून बेकायदा बांधकामांमुळे मुंबई महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असून बेकायदेशीर बांधकामांसाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करून अनधिकृत बांधकामे आटोक्यात आणण्याची मागणी आरटीआय कार्यकर्ते आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून बेकायदा बांधकामांना जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालयांतील एकूण १०,४८३ अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित केली आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीत महानगरपालिकेच्या २४ विभाग कार्यालयांतील एकूण ५५२५ अनधिकृत बांधकामांना नोटीसा देऊन, त्यापैकी १७१६ अनधिकृत बांधकामे महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आली आहेत.

उर्वरित अनधिकृत बांधकामे कायदेशीर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) मागील दोन वर्षांत कामात निष्काळजीपणा, काम वेळेत न करणे, निष्कासन कारवाईत दिरंगाई करणे, निष्कासन कारवाईच्या संदर्भात इतर कामात चालढकल करणे इत्यादी कारणांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

- ६ पदनिर्देशित अधिकारी/प्रभारी पदनिर्देशित अधिकारी यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे.
- २२ पदनिर्देशित अधिकारी/प्रभारी पदनिर्देशित अधिकारी यांची पुढील देय वेतनवाढ एक वर्षाकरिता हंगामी स्वरुपात रोखण्यात आली आहे.
- ३ पदनिर्देशित अधिकाऱ्यांना प्रत्येकी रुपये १०००/- इतका दंड ठोठावण्यात आला आहे.
- १ पदनिर्देशित अधिकाऱ्यास रुपये ५०००/- इतका दंड ठोठावण्यात आला आहे.
- १३ पदनिर्देशित अधिकारी यांची संक्षिप्त चौकशी सुरु आहे.
- १ पदनिर्देशित अधिकारी, १ प्रभारी पदनिर्देशित अधिकारी व १ क्षेत्रीय अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून, त्यांची खात्यांतर्गत चौकशी सुरु आहे.
- सी विभागाचे सहाय्यक आयुक्त, पदनिर्देशित अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांनी निलंबित करण्यात आले असून त्यांची खात्यांतर्गत चौकशी सुरु आहे.

मुंबई मधील गणपत पाटीलनगर (बोरिवली) येथील सर्वसामान्य नागरिक मुलभूत सोयी -सुविधांपासून वंचित असल्याबाबत

(२६) १२००६५ (२९-०७-२०१८) श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील गणपत पाटीलनगर (बोरिवली) येथील सर्वसामान्य नागरिकांना पाणी, वीज, शौचालय, गटारे, पायवाटा यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणपत पाटील नगर येथे मोठ्या प्रमाणात तिवरांच्या झांडाची कत्तल करुन झोडपट्टी उभारण्यासाठी भराव टाकण्यात आला असल्याची बाब माहे एप्रिल , २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी वा पाहणी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गणपत पाटील नगर या भागातील सर्वसामान्य नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) सदर परिसर "ना-विकास" व "सागरतटीय प्रतिबंधित क्षेत्र" म्हणून आजुबाजूला कांदळवन आहे. तसेच सदर परिसर गलिच्छ वस्ती म्हणून अद्यापि घोषित करण्यात आलेला नाही.

त्यामुळे सदर ठिकाणी शौचालय, गटारे, पायावाटा यांसारख्या सुविधा विकसित करणे शक्य नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) गणपत पाटील नगर येथे झोपडपट्टी उभारण्यासाठी माहे एप्रिल, २०१८ मध्ये भराव टाकल्याप्रकरणी एक व माहे ऑगस्ट २०१८ मध्ये वारंवार अनधिकृत झोपडयांचे बांधकाम करणारे तीन व्यक्तींवर महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२ स ४३ अन्वये एम.एच.बी. पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

गणपत पाटील नगर येथे अनधिकृतपणे भरणी करणाऱ्या वाहनांवर दिनांक १३.०९.२०१७ ते दिनांक ०४.०९.२०१८ या कालावधीत रु. ९१,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

गणपत पाटील नगरच्या मागील बाजूस कांदळवन असल्याकारणाने त्याचे संरक्षण करण्यासाठी तेथील भरणीकाम व अनधिकृत झोपडयांचे बांधकाम यावर महानगरपालिकेमार्फत नियमितपणे निष्कासनाची कारवाई करण्यात येते.

गणपत पाटील नगर येथे एकूण १४ गल्ल्या असून, तेथील ०१.०१.१९९५ च्या पूर्वीच्या झोपडीधारकांना एकूण ३८ उभा नळखांब जलजोडण्या देण्यात आल्या आहेत.

तसेच, ०१.०१.१९९५ नंतरच्या झोपडीधारकांना सामाजिक संस्थांमार्फत दररोज १९ टॅकर्सद्वारे पाणी पुरवठा केला जातो व ०१.०१.२००० नंतरच्या झोपडीधारकांना साधारणत: ५५ उभा नळखांब जलजोडण्यांसाठी परवानगी प्रपत्रे देण्यात आली आहेत.

गणपत पाटील नगर परिसरात महानगरपालिकेमार्फत मानवतावादी दृष्टीकोनातून आरोग्य सुविधा व स्वच्छता सुविधा पुरविण्यात येतात.

सदर परिसरात डासांचा व माशांचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता नियमित डास/अळीनाशक औषधांची फवारणी व धुम्रफवारणी करण्यात येते. उंदरांचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता नियमित उंदीरनाशक औषधे वापरण्यात येतात.

गणपत पाटील नगर परिसरातील पदपथावर तात्पुरती दहा शौचालये व गल्ली नं. १० मध्ये ११ आसनी व गल्ली नं. ७ मध्ये २१ आसनी "पैसे द्या व वापरा" तत्वावरील शौचालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, गल्ली नं. १४ मध्ये Pre-Cast Bio Toilet ची व्यवस्था करण्यात आली आहे.

मुंबई महानगरपालिका इर्ला पंम्पिग स्टेशनच्या देखभाल व दुरुस्तीचे काम कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येत असल्याबाबत

(२७) १२१३२१ (२५-०७-२०१८) प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका इर्ला पंम्पिग स्टेशनच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी सुमारे रुपये ३९ कोटी खर्च करणार असल्याचे दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेमध्ये ४५० अनुभवी अभियंते असुनही महानगरपालिकेने उभारलेल्या या ५ पम्पिंग स्टेशनची देखभाल व दुरुस्तीचे काम कंत्राटदारांकडून करुन घेण्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उदंचन केंद्राचे काम पावसाळयातील ५ महिने उदंचन केंद्राचे अहोरात्र सुरु असते व उर्वरित ७ महिने सदर उदंचन केंद्रे वापरात नसल्यामुळे ती चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अभियंता ते कामगारांपर्यंत कर्मचाऱ्यांची बारा महिने नियुक्ती करणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदर उदंचन केंद्रे कंत्राटदारामार्फत चालविण्याची तरतूद करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

पंपिंग स्टेशनच्या देखभाल व दुरुस्तीची कामे ही विशेष कामे या सदरात मोडत असल्याने ती कुशल कर्मचारी वर्गाकडून करुन घेणे गरजेचे आहे.

इर्ला पंपिंग स्टेशनच्या देखभाल व दुरस्तीचे काम स्थायी समितीच्या मंजुरीनुसार ७ वर्षांच्या कालावधीसाठी रु. ३९ कोटी इतक्या किंमतीत देण्यात आले आहे. यामध्ये पंपिंग स्टेशनचे प्रचलन व परिरक्षण, महत्वाची उपकरणे जसे- डिझेल जनरेटर, पंप, ग्रॅब, विविध विद्युत पॅनेल्स इत्यादी उपकरणांचा वार्षिक देखभाल व खर्च, डिझेल आणि कर्मचारी वर्गाचे वेतन इत्यादी बाबींचा खर्च समाविष्ट आहे.

सदर खर्च पाहता, कर्मचाऱ्यांवरील खर्च हा एकूण खर्चापैकी जास्तीत जास्त २५% येतो. तसेच सर्वात जास्त खर्च हा पंप चालविण्यासाठी लागणाऱ्या डिझेलचा, यांत्रिकी व विद्युत साधनांच्या परिरक्षणाचा असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मालाड (मुंबई) मालवणी येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

(२८) १२१३२८ (२९-०७-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) मालवणी येथील प्रभाग क्रमांक ४८, नवीन कलेक्टर कंपाऊंण्ड येथील रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने सांडपाणी रस्त्यावर येत असून दुर्गंधी पसरली असून तसेच गेट क्रमांक ७ प्लॉट ५०,५१,५२,६१,६४ येथील रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांच्या आरोग्याला, जीवीताला धोका निर्माण झाला असल्याने त्यांनी अनेक तक्रारी करुनही मुंबई महानगरपालिका दुर्लक्ष करीत आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) सदर रस्त्याची देखभाल तथा निगा बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी करण्यात येते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा मागवून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून, सदर रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत.

तसेच, सदर ठिकाणची गटारे (नाले) यातील गाळ व कचरा पावसाळयापूर्वी काढून दरवर्षी स्वच्छ करण्यात येतात व गरजेनुसार वेळोवेळी सदर गटारांची साफसफाई करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) सदर ठिकाणी स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियानांतर्गत दैनंदिन तत्वावर स्वच्छता केली जाते व कचऱ्याचा निपटारा केला जातो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील शासनाने सात महिन्यांनंतर नव्याने तयार केलेल्या यादीत ११० क्षेत्राचीच नोंद केली असल्याबाबत

(२९) १२१३३१ (२६-०७-२०१८) प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दीड हजारांहून अधिक शांतता क्षेत्र एका रात्रीत मोडीत काढल्यानंरत शासनाने सात महिन्यांनंतर नव्याने तयार केलेल्या यादीत केवळ ११० शांतता क्षेत्राचीच नोंद केली असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त यादीत शिवाजी पार्कसह, शीव रुग्णालय, सेंट झेवियर्स महाविद्यालय तसेच अन्यही महत्वाची ठिकाणे या यादीतून वगळण्यात आली असुन यामुळे नागरिक तसेच रुग्णांना यामुळे मानसिक तसेच शारिरिक त्रास सहन करावा लागणार आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत याबाबत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आह काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) सदर ११० क्षेत्रे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे शांतता क्षेत्रे म्हणून घोषित करण्यात आली आहेत.
(२) व (३) पुढील टप्प्यातील शांतता क्षेत्रांचे निश्चितीकरण करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

राज्यातील नगरपालिका शिक्षण मंडळांच्या शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाकडून वेतन देण्याबाबत

(३०) १२२००५ (३०-०७-२०१८) श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नगरपालिका शिक्षण मंडळांच्या शिक्षकांना शासनाकडून वेतन अनुदानापोटी नगरपालिकांच्या अ',ब',क',वर्गानुसार अनुकमे ८०,९० व १००% अनुदान शासनाच्या शिक्षण विभागाकडून तर उर्वरीत अनुदान नगरविकास विभागाकडून देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन्ही विभागातील वेतनाची रक्कम एकाच वेळी मिळत नसल्याने नगरपालिका शिक्षकांचे पगार दोन टप्प्यात व अनियमीत होत असल्याने नगरविकास विभागाकडील रक्कम शिक्षण विभागाला वर्ग करून १०० टक्के वेतन शिक्षण विभागाकडून देण्याची मागणी राज्यातील विविध शिक्षक संघटनांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.
(२) या आशयाची निवेदने प्राप्त झाली आहेत.
(३) नगरपरिषदांना सहायक अनुदान वितरित करताना शिक्षणावरील खर्चाकरिता २० % व १० % हिश्श्याची रक्कम नगरपरिषद प्राथमिक शिक्षण फंड किंवा शिक्षण मंडळाकडे सुपुर्द करण्याच्या सूचना देण्यात येतात.

सदर उर्वरित अनुदान नगर विकास विभागाकडून स्वतंत्रपणे अदा करण्यात येत नसल्याने नगर विकास विभागाकडील रक्कम शालेय शिक्षण व क्रिडा विभागास वर्ग करण्याची बाब विचाराधीन नाही.

तथापि, या आशयाच्या प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांकडून अभिप्राय मागवून शालेय शिक्षण विभागाच्या स्तरावर तपासणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेमधील सोयी सुविधेबाबत

(३१) १२२०८१ (२९-०७-२०१८) श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि. ठाणे) येथे ३० हजार क्षेत्रफळ परिसरात गरीब, मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासनाने साडे पाच कोटी रुपयांचे अनुदान उपलब्ध करून दिले असून सदर जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासिकेत सर्वसामान्य विध्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षेची तयारी करणे ह्या सात्विक विचाराने सदर अभ्यासिकेची निर्माती झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभ्यासिकेत पाण्याची व्यवस्था नाही, प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक केलेली नाही, संगणक, वायफाय, एसी, दूरध्वनी आवश्यक कर्मचारी अभ्यासिकेला साजेशी पुस्तके नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरच्या सुविधा विद्यार्थ्यांना मिळणेसाठी प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१९) : (१) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका शाळा क्रमांक ८, ११ व २९ च्या परिसरात गरीब, मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेची (ग्रंथालय) इमारत उभारण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर अभ्यासिकेत पाण्याची व्यवस्था असून, संगणक, वायफाय, एसी, दूरध्वनी, आवश्यक कर्मचारी व अभ्यासिकेसाठी आवश्यक पुस्तके याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शासनामार्फत दिले जाणारे साहित्य व पोषण आहाराबाबत

(३२) १२२३११ (२९-०७-२०१८) श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शासनामार्फत गरीब, होतकरू शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शालेय साहित्य, बूटमोजे, चिक्की इत्यादी मोफत दिले जात असून सदरचे साहित्य, पोषण आहार शालेय वर्षाच्या सुरुवातीला न देता दिवाळी/दसरा दरम्यान दिले जाते ही बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेनुसार शालेय गरीब विद्यार्थ्यांना उशिरा दिले जाणारे गणवेश, पाठ्यपुस्तके इत्यादीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार दोषींवर कारवाई करुन विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला सदर शालेय साहित्य व पोषण आहार उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१९) : (१) व (२) उल्हासनगर महानगरपालिका शाळांमध्ये गरीब, होतकरु शालेय विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी शाळा चालू होण्यापूर्वी मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शालेय साहित्य, बुटमोजे, चिक्की इत्यादी पुरविण्यात येते. त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व पोषण आहाराचे वाटप शाळा सुरु झाल्याच्या पहिल्या दिवसापासून नियमितपणे करण्यात आले असल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

परंतु विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तु स्वरुपात मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतर रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करण्याच्या अनुषंगाने मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि, सदर विद्यार्थ्यांकडून बँक खाती उघडण्याबाबत आवश्यक तेवढा प्रतिसाद न मिळाल्याने, सदर शैक्षणिक साहित्य व पुरक पोषण आहार विद्यार्थ्यांना देण्याबाबत ई-निविदा मागवून माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये शालेय साहित्य व पुरक पोषण आहारा पुरवठा करण्यात आला.
(३) व ४) सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शालेय साहित्य व पोषण आहार उपलब्ध करुन देण्याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• सर्व शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यांची माहिती मागवून, सदर साहित्य खरेदी करण्याकरिता लागणारी रक्कम सदर खात्यांमध्ये वर्ग करण्यात आली आहे.
• सदर शाळा व्यवस्थापन समितीमार्फत सर्व मनपा शाळा विद्यार्थ्यांना सदर रकमेचे वितरण करुन तसा अहवाल सादर करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

कुर्ला पश्चिमेकडील (मुंबई उपनगर) सुमारे १५ उपहारगृहांकडे आरोग्य परवाना नसून १७ उपहारगृहांकडे अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र नसल्याबाबत

(३३) १२२४४९ (२९-०७-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला पश्चिमेकडील (मुंबई उपनगर) सुमारे १५ उपहारगृहांकडे आरोग्य परवाना नसुन १७ उपहारगृहांकडे अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र नसल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित उपहारगृहांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी विविध हॉटेल्स, गेस्ट हाऊसवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ अन्वये एकूण २२०८ आस्थापनांचे निरीक्षण करुन १९८५ प्रकरणी तपासणी अहवाल, ११२ प्रकरणी न्यायालयीन खटले, ४५२ आस्थापनांवर जप्तीची कारवाई व १ आस्थापनेवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच, ५०३ गॅस सिलेंडर्स जप्त करण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहेत.

जोगेश्वरी (जि.मुंबई उपनगर) पश्चिमेला असलेल्या महानगरपालिकेच्या ओशिवरा होमच्या हलगर्जीपणामुळे नवजात बालकाचा मृत्यु झाल्याबाबत

(३४) १२२८७० (२९-०७-२०१८) डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी (जि.मुंबई उपनगर) पश्चिमेला असलेल्या महानगरपालिकेच्या ओशिवरा होमच्या हलगर्जीपणामुळे ३० वर्षीय श्रीमती निखत मलिक या महिलेच्या नवजात बालकाचा माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मृत्यु झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधित अधिकारी व डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१९) : (१) जोगेश्वरी (पश्चिम) येथील महानगरपालिकेच्या ओशिवरा प्रसुतीगृहात श्रीमती निखत मलिक या महिलेच्या नवजात बालकाचा दिनांक १२.०२.२०१८ रोजी मृत्यू झाला हे खरे आहे.

तथापि, सदर नवजात बालकाचा मृत्यू प्रसुतीगृहाच्या हलगर्जीपणामुळे हे खरे नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(२) श्रीमती निखत मलिक यांना प्रसुतीआधी रक्तस्त्राव सुरु झाल्याने त्यांना सिझेरिअन शस्त्रक्रियेची गरज होती. त्यावेळी भूलतज्ञ डॉक्टरांशी तातडीने संपर्क न झाल्याने श्रीमती मलिक यांना १०८ रुग्णवाहिकेतून कुपर रुग्णालयात संदर्भित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तथापि सदर रुग्णवाहिकेवर कार्यरत डॉक्टर उपलब्ध नसल्याने श्रीमती मलिक यांना कुपर रुग्णालयात नेण्यास विलंब झाला व तेथे त्यांचे सिझेरिअन करुनही नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकरणी १०८ रुग्णवाहिकेवरील कार्यरत डॉक्टरला महानगरपालिकेमार्फत निलंबित करण्यात आले आहे. तसेच, सदर रुग्णालयात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी (बंधपत्र) यांना प्रथमदर्शनी चौकशीनुसार निलंबनाचे आदेश देण्यात आले होते.

तथापि, खात्यांतर्गत चौकशीमध्ये बंधपत्रीत वैद्यकीय अधिकाऱ्यावरील हलगर्जीपणाचे आरोप सिध्द होत नसल्याने त्यांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने राष्ट्रीय उपक्रमांतर्गत फिफा फुटबॉल स्पर्धेचे चांदीबाई मैदानावर आयोजन न करता देयके काढल्याबाबत

(३५) १२३१०२ (२९-०७-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेने राष्ट्रीय उपक्रमांतर्गत फिफा फुटबॉल स्पर्धेचे चांदीबाई मैदानावर आयोजन न करता लाखो रुपयांचे देयके काढल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१९) : (१), (२) व (३) राष्ट्रीय उपक्रमांतर्गत फिफा फुटबॉल वर्ल्डकप स्पर्धा २०१७ चा प्रसार/प्रचार मोठया प्रमाणावर होत असल्याने, फुटबॉल खेळाडूंचा उत्साह लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील व्ही.टी.सी. मैदान, सेन्चुरी हायस्कूल मैदान व चांदीबाई कॉलेज मैदान या तीन मैदानांवर फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्याकरिता महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आली होती.

तथापि, चांदीबाई कॉलेज मैदानावर पावसामुळे खूप मोठे जंगली गवत असल्याने सदर मैदान फुटबॉल खेळण्याकरिता योग्य नव्हते. त्यामुळे दिनांक १५ व १६ सप्टेंबर, २०१७ रोजी सदर फुटबॉल स्पर्धा व्ही.टी.सी. मैदान व सेन्चुरी हायस्कूल मैदान या दोन ठिकाणी पार पाडण्यात आली.

चांदीबाई कॉलेज मैदानावर फुटबॉल स्पर्धेचे प्रत्यक्ष आयोजन करण्यात न आल्यामुळे त्यांना कोणतेही देयक अदा करण्यात आले नसल्याचे उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

देवरुख नगरपंचायत (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) स्थापनेपासून कायमस्वरुपी मुख्याधिकारी कार्यरत नसल्याबाबत

(३६) १२३२०८ (२५-०७-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरुख नगरपंचायत (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) स्थापनेपासून कायमस्वरुपी मुख्याधिकारी कार्यरत नसल्यामुळे विकासकामे व प्रशासकीय कामांना विलंब होत आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नगरपंचायत येथे कायमस्वरुपी मुख्याधिकारी नियुक्त होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार मागणी करूनही याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नगरपंचायतीला कायमस्वरुपी मुख्याधिकारी नियुक्त करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१९) : (१) देवरुख नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी यांची दि.३१/०५/२०१७ रोजी बदली झाल्यानंतर सदर नगरपंचायतीला कायमस्वरुपी मुख्याधिकाऱ्याची नियुक्ती झालेली नव्हती, ही वस्तुस्थिती आहे.

- उक्त कालावधीत देवरुख नगरपंचायतीमध्ये पुर्णवेळ मुख्याधिकारी कार्यरत नसले तरी, प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने देवरुख नगरपंचायतीचा अतिरिक्त कार्यभार प्रथम मुख्याधिकारी, चिपळूण व तद्नंतर मुख्याधिकारी, लांजा यांच्याकडे सोपविण्यात आला होता. त्यामुळे विकासकामे व प्रशासकीय कामांना विलंब झाला, ही वस्तुस्थिती नाही.

(२) व (३) दि.१२ जून, २०१८ रोजीच्या शासन आदेशान्वये देवरुख नगरपंचायत रिक्त मुख्याधिकारी पदी शासनाने पुर्णवेळ मुख्याधिकारी यांची नियुक्ती केलेली असून नवीन मुख्याधिकारी देवरुख नगरपंचायत येथे रुजू झाले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उल्हासनगर (जि. ठाणे) महानगरपालिकेच्या शाळांची दुरवस्था झाल्याबाबत

(३७) १२३६२८ (२६-०७-२०१८). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिकांचे शिक्षण मंडळ बरखास्त झालेले असून महानगरपालिकेचा संपूर्ण कार्यभार आयुक्तांकडून केला जात असताना शिक्षण विभागाचे अंदाजपत्रक वेगळे जात असून शिक्षण विभागाची कोट्यवधी रुपयांच्या कामाची देयके आयुक्त व उप आयुक्तांच्या मंजुरीविना पारित केली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या विविध माध्यमाच्या २८ शाळा आहेत तसेच सदर शाळांसाठी शिक्षण विभागाकडून ५० ते ६० कोटीची तरतूद केली जात असतांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळांची दूरवस्था झाली असून पावसाळ्यात विध्यार्थ्यांना गळक्या वर्ग खोल्यामध्ये शिकविले जाते व शासनाकडून मिळत असलेली कोणतीही सुविधा वेळेवर मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०१-२०१९) : (१) उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ सन २०१३ मध्ये बरखास्त झाल्याने, शिक्षण विभागाचे सर्व कामकाज आयुक्तांच्या आदेशानुसार करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागात शासनाचे ५०% व उल्हासनगर महानगरपालिकेचे ५०% अनुदानानुसार वार्षिक आर्थिक अंदाजपत्रक तयार करण्यात येते. त्यामुळे सदर अंदाजपत्रक वेगळे ठेवण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रत्येक कामाचे देयक आयुक्त व उपायुक्त यांच्या मंजुरीने पारित केले जातात.

(२) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात मनपाच्या विविध माध्यमाच्या २५ शाळा कार्यरत असून, सदर शाळांची दुरुस्ती व नवीन इमारतीकरिता आयुक्तांच्या मंजुरीने ठरावकि रक्कम मंजुर करुन पुढील कार्यवाही करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व शाळांची दुरुस्ती झाली असल्याने, विद्यार्थ्यांना पावसाळयात गळक्या वर्गखोल्यांमध्ये शिकविले जात नसल्याचे व शासनाकडून मिळत असलेल्या सर्व सुविधा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत असल्याचे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर (जि.जळगांव) शहराच्या व्यवस्थापन प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३८) १२४०७७ (२५-०७-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (ता. मुक्ताईनगर, जि.जळगाव) या शहरात नगर पंचायत असल्याने या शहराची नगरविकास विभागाकडून नाबार्ड अर्थसहाय्यीत ग्रामीण पायाभूत विकास निधी-१९ (आर.आय.डी.एफ) अंतर्गत निवड करण्यात आली करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुक्ताईनगर शहरास सांडपाणी, भूमीगत गटारे, सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्प,

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी लागणारा निधी उपलब्ध करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१९) : (१) व (२) व (३)

• नाबार्ड अर्थसहाय्यीत ग्रामीण पायाभूत विकास निधी-१९ (आर.आय.डी.एफ) ही योजना ग्रामीण भागाच्या पायाभूत विकासासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून राबविली जाते.

• मुक्ताईनगर येथे नगरपंचायतीची स्थापना झाली असल्याने या योजनेअंतर्गत मुक्ताईनगर शहराची निवड करण्यात आलेली नसल्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने कळविले आहे.

• महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत मुक्ताईनगर शहरास सांडपाणी, भूमीगत गटारे, सांडपाणी पुर्नप्रक्रिया प्रकल्प, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी लागणारा निधी उपलब्ध करण्याबाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी, मुक्ताईनगर नगरपंचायत यांच्याकडून विहीत मार्गाने शासनास प्राप्त झाल्यास त्याबाबत विचार करण्यात येईल.

डहाणू (जि.पालघर) नगरपरिषदेमधील रिक्त पदे भरण्याबाबत

(३९) १२४६७७ (३०-०७-२०१८) श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) नगरपरिषदेमधील मुख्याधिकारी, डहाणूचे उपजिल्हाधिकारी, डहाणू आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, डहाणू गट शिक्षणाधिकारी इ. पदे रिक्त असल्यामुळे या तालुक्याचा कारभार ठप्प झालेला असून नागरिक व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

• नगर विकास विभागाच्या दि.१२.०६.२०१८ च्या शासन आदेशान्वये श्री.विजय द्वासे यांची मुख्याधिकारी, डहाणू नगरपरिषद, जि. पालघर या पदावर पदस्थापना करण्यात आली असून, सदर पदी ते कार्यरत आहेत.

• उपजिल्हाधिकारी, डहाणू या पदावर सामान्य प्रशासन विभागाने दि.२९.०९.२०१८ च्या आदेशान्वये भा.प्र.से अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.

• प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू, जि.पालघर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दि.२५.०४.२०१८ च्या आदेशान्वये श्री.अजित कुंभार, भा.प्र.से. अधिकारी यांचेकडे सोपविला आहे.

• डहाणू गटशिक्षणाधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.विष्णु रावते यांचेकडे दि.२०.०७.२०१७ पासून सोपविण्यात आला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

आर्णी (जि.यवतमाळ) नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या चौकशीबाबत

(४०) १२८२५९ (०६-१२-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.करणकुमार चव्हाण, मुख्याधिकारी, आर्णी नगरपरिषद (जि.यवतमाळ) यांच्याविरुद्ध अनेक तक्रारी आल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव (नवि-२), नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे दिनांक १४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्या सुमारास निवेदन देऊन त्यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विनंतीनुसार मुख्याधिकारी, आर्णी नगरपरिषद यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार त्यांना निलंबित करण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३)

श्री. करणकुमार चव्हाण, मुख्याधिकारी, नगरपरिषद आर्णी, जि.यवतमाळ यांचे विरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडून शासनाने प्राथमिक चौकशी अहवाल मागविला आहे. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी त्यांचे दिनांक १५/१०/२०१८ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, यवतमाळ (अध्यक्ष) व लेखाधिकारी, अंतर्गत लेखा परिक्षक विभाग, यवतमाळ (खर्च) (सदस्य) यांची चौकशी समिती नेमली असून समितीकडून तक्रारींची चौकशी करण्यात येत आहे. सदर समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्याचे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भ्ावत नाही.

राज्यात राखीव प्रभागातून निवडून आल्यानंतर सहा महिन्यात जात पडताळणी दाखला सादर न केलेल्या लोकप्रतिनिधींना अपात्र ठरविण्याच्या निकालाबाबत

(४१) १३०९५७ (०८-१२-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राखीव प्रभागातून निवडून आल्यानंतर सहा महिन्यात जात पडताळणी दाखला सादर न केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधींना अपात्र ठरविण्याचा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकालानुसार या लोकप्रतिनिधींना अपात्र ठरविण्याची कार्यवाही करावी असे पत्र राज्य निवडणूक आयोगाने शासनाला पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाने हजारो लोकप्रतिनिधींचे सदस्यत्व रद्द होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने निर्धारीत केलेला जात पडताळणी दाखला सादर न केलेल्या या लोकप्रतिनिधींना हा दाखला सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१९) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय व अध्यादेश क्र.२०, दि.२७.०९.२०१८ व अधिनियमातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदीन्वये केलेली सुधारणा यानुसार अपात्रतेबाबतचे प्रस्ताव तपासून नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच, सदर अधिनियमात केलेल्या सुधारणेनुसार राखीव प्रभागातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास १२ महिने इतका कालावधी विहित करण्यात आला आहे. सदर कालावधी हा दि.०७.०४.२०१५ पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भ्ावत नाही.

राज्यातील नगरपरिषदांमध्ये कार्यरत असलेल्या स्वच्छता निरीक्षक यांचे राज्यसेवा संवर्गात समावेशन आणि रिक्त पदे भरण्याबाबत

(४२) १३१५०९ (०८-१२-२०१८) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नगरपरिषदांमध्ये कार्यरत स्वच्छता निरीक्षक यांचे राज्यसेवा संवर्गात समावेशन करणे आणि रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयास १ वर्ष उलटूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून सुरु असलेले स्वच्छ सर्व्हेक्षण अभियान राबविण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील स्वच्छता निरीक्षक यांचे संवर्ग समावेशन व रिक्त पदांची भरती करणेबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१९) : (१) व (२) राज्यस्तरीय संवर्गामध्ये स्वच्छता निरीक्षक या पदाचा समावेश करण्यास दि.०७.०३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र नगरपरिषद स्वच्छता निरीक्षक सेवा या संवर्गाची एकूण ६१९ ही पदसंख्या दि.०७.०१.२०१९ च्या अधिसूचनेन्वये निश्चित करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) स्वच्छता निरीक्षक संवर्गातील पदे अधिसूचित केली असून, सेवा प्रवेश नियमानुसार रिक्त पदांसंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अलिबाग (जि.रायगड) नगरपरिषदेस विशेष अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत

(४३) १३२१०३ (१०-१२-२०१८) श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही नगरपरिषदांना अत्यावश्यक कामांची निकड लक्षात घेवून वैशिष्टपूर्ण योजनेअंतर्गत विशेष अनुदान उपलब्ध करून देण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय नगरविकास विभाग क्र.पूरक-२०१३/प्र.क्र.१०५/नवि-४, दि.२७ ऑगस्ट २०१३ अन्वये रायगड जिल्हयातील अलिबाग नगरपरिषदेस शासन निर्णय क्र.जीईएन-२०१३/प्र.क्र.२९५/नवि-१६, अनुसूची क्र.५ नुसार ७ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रक्कम अलिबाग नगरपरिषदेकडे वर्ग न करता त्या रक्कमेतून मौजे आवास येथील (१) मौजे आवास (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील सिद्धेश्वलर, खांबळेश्वर, सोमेश्वर व इतर गाव तलावामधून गाळ काढणे, संरक्षक भिंत बांधणे, सुशोभिकरण करणे, प्राथमिक आरोग्य केंद्र बांधणे, नागेश्वर मंदिर या तीर्थक्षेत्राचा विकास करणे व समुद्र किनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारा बांधणे अशी या ग्रामीण भागातील एकूण ४ कामांसाठी रू.७.०० लाख मंजूर करण्यात येवून कार्यान्वित यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग व एम.एम.आर.डी.ए. यांच्या अधिपत्याखाली रक्कम देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या यंत्रणेविरूद्ध शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे तसेच नियमानुसार ही रक्कम खर्च करण्यात न आल्याने सदर अखर्चीत रकमेबाबत शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०१९) : (१), (२), (३), (४) व (५)
•राज्यातील नगरपरिषदांना "वैशिष्ट्यपूर्ण" कामांसाठी विशेष अनुदान देण्यात येते.
•त्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अलिबाग नगरपरिषदकरिता मौजे आवास, ता.अलिबाग, जि.रायगड येथील चार विकास कामांकरिता रु.५.२० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.
•सदर विकास कामांपैकी तीन कामांकरिता प्रथम सार्वजनिक बांधकाम विभाग व एका कामाकरिता एम.एम.आर.डी.ए. कार्यान्वयन यंत्रणा निश्चित करण्यात आले होते.
•तथापि, तद्नंतर सदर चारही विकास कामांकरिता एम.एम.आर.डी.ए. ला कार्यान्वयन यंत्रणा करण्याचे निश्चित झाल्याने प्रस्तुत विकास कामांचा निधी एम.एम.आर.डी.ए. ला वर्ग करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले.
•प्रस्तुत कामांकरिता एम.एम.आर.डी.ए. ने दि.२९.५.२०१७ अन्वये कार्यारंभ आदेश दिले आहेत.
•तथापि, गुरचरण जागेमध्ये बांधकाम अनुज्ञेय नसल्याने तहसिलदार, अलिबाग यांनी कामास "स्थगिती" दिली आहे.
•सदर स्थगिती आदेश उठविण्याच्या अनुषंगाने संबंधितांकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचा अहवाल एम.एम.आर.डी. ए. ने सादर केला आहे.

पुण्याला मिळालेला स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत निधी अखर्चित राहिल्याबाबत

(४४) १३२८५५ (१०-१२-२०१८) श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत केंद्राकडून मिळालेल्या निधीतील ७० टक्के निधी खर्च झाला असेल तरच या वर्षीचा निधी दिला जाईल असे केंद्राकडून पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कंपनीला कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुण्याला मिळालेल्या निधीतील केवळ २५ टक्केच निधी खर्च झाल्याने दरवर्षी केंद्राकडून मिळणारा १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुण्याला सन २०१५ - १६ व सन २०१६ -१७ या वर्षात मिळालेल्या निधीपैकी ७० टक्के निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत वर्षीपर्यंत फक्त २५ टक्केच निधी खर्च झाल्याने सन २०१८ - २०१९ वर्षीचा निधी केंद्र शासनाकडून मिळण्यास अडचण निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, स्मार्ट सिटी साठीचा निधी खर्च करण्याच्या प्रक्रियेबाबतची चौकशी करून कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०१-२०१९) : (१) (२) (३) व (४)

• पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड या विशेष उद्देश वहनास केंद्र शासनाकडून रु.१९६ कोटी, राज्य शासनाकडून रु.९८ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेकडून रु. १०१ कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आला आहे. अशा प्रकारे एकूण रु.३९५ कोटी निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

• सदर प्राप्त निधीमधून नोव्हेंबर २०१८ अखेर पर्यंत रु. १०० कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(५) व (६)

• सदर विशेष उद्देश वहनास करामध्ये सवलत मिळण्याबाबत राज्य शासनाकडून निवेदने पाठविण्यात आली होती.

• त्यासंदर्भात राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

उमरगा (जि.उस्मानाबाद) येथील स्मशानभूमीच्या विकासकामासाठी निधी मंजूर करणेबाबत

(४५) १३२८६७ (१०-१२-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा (जि.उस्मानाबाद) 'क' दर्जाची नगरपरिषद असून उमरगा शहरातील ४ स्मशानभूमीच्या विकासासाठी निधी मंजूर करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरगा शहरातील स्मशानभूमीच्या विकासकामांसाठी शासन निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०१-२०१९) : (१), (२) व (३)

• उमरगा शहरातील ४ स्मशानभूमीच्या विकासासाठी निधी मंजूर करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींचे दि. २८ ऑगस्ट, २०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

• "वैशिष्ट्यपूर्ण" योजनेंतर्गत स्मशानभूमी विकासासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता उमरगा नगरपरिषद, जि.उस्मानाबाद साठी रू.२ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.

नाशिक जिल्हयातील सातपूर व अंबड परिसरातील मुख्य रस्त्यांवर खड्डे पडल्याबाबत

(४६) १३३१६३ (३०-११-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील सातपूर व अंबड परिसरातील मुख्य रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे व कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०१-२०१९) : (१) होय.

(२) नाशिक महानगरपालिकेमार्फत सातपूर व अंबड परिसरातील रस्ते डांबरीकरण करण्याचे एकुण रु.२६ कोटीचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून, याबाबत महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया सुरु आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत या भागातील खड्डे खडी मुरुमाने / बीबीएमने भरण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भ्ावत नाही.

राज्यातील नगरपरिषद कर्मचा-यांना पुर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती देण्याबाबत

(४७) १३४०१८ (१०-१२-२०१८) डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाढते नागरीककरण लक्षात घेता नगरपरिषद कर्मचा-यांचे सहा संवर्ग निर्माण करण्याचा निर्णय नगरविकास विभागाने घेतल्यानंतर दिनांक ०१ जानेवारी, २००८ रोजी पासून कर्मचा-यांचे संर्वगात समावेश करण्यात आले मात्र दरम्यानच्या काळात पदोन्नती प्रक्रीया व पदोन्नतीबाबत निर्बंध घातल्यानंतर संर्वगातील जेष्ठ कर्मचा-यांची पदोन्नती प्रक्रीया रखडल्यामुळे हजारो कर्मचा-यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचा-यांची होत असलेली कुचंबणा व त्यामुळे नगरपरिषद प्रशासनातील कामावर होणा-या परिणामामुळे नागरीकांच्या मुलभूत सुविधेच्या कामकाजावरही परिणाम होत असल्याचे शासनाच्या निर्देशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संर्वग प्रक्रीयेमुळे सन २००६ पासूनच्या कर्मचा-यांना पुर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०१-२०१९) : (१) व (२) हे खरे नाही.

(३)

• राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायतीचा कारभार सुरळीत व सक्षमपणे चालविण्यासाठी "महाराष्ट्र नगरपरिषदा/नगरपंचायती व औद्योगीक नगरे राज्यसेवा (समावेशन, भरती व सेवेच्या शर्ती) नियम २००६" नुसार ६ संवर्ग स्थापन करण्यात आले आहेत.

• या सर्व सेवांतर्गत राज्यस्तरीय कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती संदर्भात महाराष्ट्र नगरपरिषदा/नगरपंचायती व औद्योगीक नगरी राज्यसेवा (समावेशन, भरती व सेवेच्या शर्ती) (सुधारणा) नियम २०१७" विहित असून, त्यानुसार वरिष्ठ संवर्गामध्ये पदोन्नती देताना निम्नसंवर्गात किमान ३ वर्षाची अट विहित करण्यात आली आहे.

• तसेच, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कराची (एलबीटी) थकबाकी वसुलीमध्ये अनियमितता झाल्याबाबत

(४८) १३४७४४ (०५-१२-२०१८) डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेमध्ये स्थानिक संस्था कराची (एलबीटी) थकबाकी वसुलीबाबत कुळकर्णी ऑटो मोबाईलचे भागीदार श्री.तुषार कुळकर्णी यांना सन २०१२-१३, २०१३-१४ या वर्षाची थकबाकी दंडासह भरण्याबाबत नोटीस दिली होती परंतु सदर आर्थिक वर्षाचा स्थानिक संस्थाकराचा भरणा बॅकेच्या चलानद्वारे केल्याची लेखी तक्रार दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास सामान्य प्रशासन विभागाला सादर केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कराचा भरणा केल्यानंतरसुध्दा त्याची नोंद न होणे यामध्ये मोठी आर्थिक अनियमितता झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०१९) : (१) होय. अमरावती महानगरपालिकेकडे अशी तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२), (३) व (४) प्राप्त तक्रारीबाबत चौकशीअंती खालील वस्तुस्थिती दिसून येत असल्याचे, आयुक्त अमरावती महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

• स्थानिक संस्था कर अधिनियमाच्या कलम ३३ (७) नुसार कुलकर्णी ऑटोमोबाईल्स यांना

सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ करिता दिनांक १५/०६/२०१५ व दिनांक १८/०६/२०१५ रोजी आवश्यक ती नोटीस पाठविण्यात आलेली होती.

- त्यानुसार संबंधीत पक्षकाराने विहित मुदतीत उपस्थित राहून अथवा अन्य प्रकारे कोणतेही पुरावे सादरही केले नाहीत, त्यामुळे या अधिनियमातील कलम ३३ (५) नुसार असलेल्या अधिकारातंर्गत उपलब्ध अभिलेखाच्या आधारे, एकतर्फी कर निर्धारण करुन, दिनांक ०७/०८/२०१८ रोजी आदेश पारित केलेले आहेत व त्यानुसार अर्जदारास कळविण्यात आलेले आहे.
- सदरचे आदेश अर्जदारास मान्य नसतील तर, अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदार या आदेशाविरोधात अपील दाखल करु शकतो.
- या प्रकरणात झालेले कर निर्धारण हे अधिनियमातील तरतुदीनुसार झालेले असून, त्यानुसार आकारण्यात आलेला कर हा संबंधीत पक्षकाराने थेट बँकेत भरणा भरावयाचा असल्याने, या आकारणीत गैरव्यवहार होण्याची शक्यता नाही आणि तसे झाल्याचे दिसूनही आलेले नाही.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सुकळी येथील कंपोस्ट डेपोमध्ये कच-याला वारंवार लागणा-या आगीबाबत

(४९) १३४७५१ (०५-१२-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सुकळी येथील कंपोस्ट डेपोमध्ये कच-याला वारंवार आग लागण्याचे प्रकार दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ व २० ऑक्टोबर, २०१८ वा तद्नंतरही दोन वेळा आग लागुन मोठ्या प्रमाणात प्रदुषण होवून नागरिकांच्या जिवितास धोका उत्पन्न होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वीही अशाच प्रकारच्या आग लागणाच्या घटनेच्या पार्श्वभुमिवर दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी तत्कालीन आयुक्त यांनी बैठक घेवून स्वच्छता, पर्यावरण, बांधकाम व अग्नीशमन विभागाला उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्देशानूसार कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९) : (१) अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सुकळी येथील कंपोस्ट डेपोमधील कांही भागातील कचऱ्याला आगी लागल्या आहेत तथापि, सदरच्या आगी वेळीच नियंत्रणात आणून, विझवण्याची कार्यवाही अमरावती महानगरपालिकेकडून करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांनी दिनांक २८/०३/२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.:-

• या ठिकाणी जबाबदार आणि जेष्ठ स्वास्थ निरिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
• या ठिकाणी लागणाऱ्या आगीसाठी अग्निशमन विभागाचे वाहन चोवीस तास कार्यान्वीत आहे.
• या डेपोमध्ये कचरा वेचकामार्फत लावण्यात येणाऱ्या आगीबाबत संबंधीत कचरा वेचकाविरुध्द फौजदारी तक्रारी नोंदविल्या आहेत.
• आणीबाणीच्या प्रसंगात या ठिकाणी तात्काळ पाणी उपलब्ध होण्यासाठी दोन कूपनलिका उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.
• या ठिकाणच्या कचरा वेचकांना महानगरपालिकेकडून ओळखपत्रे दिलेली आहेत.
• या डेपोतील कचऱ्यास आग लागू नये व प्रदुषण होऊ नये यासाठी दर १५ दिवसातून बायोकल्चरची फवारणी करण्यात येत आहे.
• याशिवाय स्वच्छ महाराष्ट्र अभियानातंर्गत येथील कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु करण्यात आल्याचे आयुक्त, अमरावती मनपा यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

अमरावती महानगरपालिकेमधील बाजार परवाना विभागामध्ये झालेल्या आर्थिक अनियमिततेबाबत

(५०) १३४७५२ (०५-१२-२०१८) डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती महानगरपालिकेमधील बाजार परवाना विभागामध्ये सन २०१६ ते २०१८ कालावधीमधील विशेष लेखा परिक्षण अहवाल मुख्य लेखा परिक्षक यांनी दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ रोजी आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांना सादर केला असून. यामध्ये २.३४ कोटी रुपयांची अनियमितता झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०१९) : (१), (२) व (३)
• अमरावती महानगरपालिकेच्या बाजार व परवाना विभागाच्या सन २०१३-१४ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणामध्ये, पावती पुस्तकानुसार रकमा महानगरपालिका फंडात जमा न करणे, रक्कम विलंबाने जमा करणे, पावतीत खोडतोड करणे, मागणी रजिस्टरमध्ये नोंदी न घेणे, वसुली कमी करणे, कंत्राटाची रक्कम व थकित भाडयाची वसुली न करणे इ. आक्षेप नोंदवून अनियमितता झाल्याचा अहवाल मुख्य लेखापरिक्षणक यांनी सादर केला आहे. परंतु २.३४ कोटीची अनियमितता झाल्याचे अहवालात नमूद नाही.

• प्राप्त अहवालातील वस्तुस्थितीच्या आधारे, प्रथम दर्शनी दोषी दिसून येत असलेल्या महानगरपालिकेच्या दोन कनिष्ठ लिपीकांना अनुक्रमे दिनांक ११/०६/२०१८ व दिनांक ०५/१०/२०१८ रोजी निलंबित करण्यात आलेले आहे.

• या दोघांविरोधात दोषारोपपत्र बजावण्यात आले असून, पुढील प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

• तसेच यातील एका कनिष्ठ लिपीका विरुध्द दिनांक १४/११/२०१८ रोजी सिटी कोतवाली पोलीस स्टेशन मध्ये एफआयआर ही दाखल करण्यात आलेला आहे.

• प्रस्तुत प्रकरणात नक्की किती रुपयाची अनियमितता झालेली आहे, याबाबतची पडताळणी सुरु असल्याचे आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.